# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २७ (           ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने मुंबई येथील युपीएल लि. या भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी समवेत कृषि विषयक सामंजस्य करार केला असून सोमवार, दि.२७ मे, २०१९ रोजी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

युपीएल ही बहुराष्ट्रीय कंपनी असून १२३ देशात त्यांची कार्यालये आणि २४ उत्पादन केंद्रे आहेत. उत्कृष्ट प्रतीचे पीक संरक्षण रसायने, बुरशीनाशके, बी-बीयाणे व इतर कृषी आधारीत उत्पादने निर्माण केली जातात. या करारान्वये कंपनीला विद्यापीठाकडून वैज्ञानिक सल्ला दिला जाईल. दुष्काळावर मात करण्याकरिता लागणारे तंत्रज्ञ ाान तसेच समायोजित शाश्वत विकासासाठी, जैवतंत्रज्ञानाद्वारे पीक संरक्षण उत्पादने उत्पादित करण्यासाठी एकत्र काम करणे आदी गोष्टींचा या करारात उल्लेख करण्यात आला आहे. गेल्या महिन्यात या कंपनीने परिसर मुलाखतीद्वारे विद्यापीठातील सात विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव भ.भा.पाटील यांनी स्वाक्षरी केली. तर युपीएलच्या वतीने उपाध्यक्ष डॉ.राजन सिरसाट, उप महाव्यवस्थापक विकास ओलतीकर, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, जैवशास्त्र प्रशाळेचे प्रा.ए.बी.चौधरी, डॉ.भूषण चौधरी हे उपस्थित होते.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २७ मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
(डॉ.सुनील पाटील )<br>
जनसंपर्क अधिकारी